

# पर्यटनाचा हातभार

**पर्यटन व रिअल इस्टेट एकमेकांना पूरक ठरत असून त्यांची वाढ अर्थव्यवस्थेलाही हातभार लावत आहे.**

पर्यटन आणि रिअल इस्टेट हे दोन भिन्न उद्योग असले तरी ते परस्परांना पूरक ठरत आहेत. एखाद्या पर्यटनस्थळातील आवडीची ठिकाणे पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना तेथे राहण्यासाठी चांगली सुविधाही हवी असते. ही दोन्ही उद्योगांसाठी म्हणूनच 'विन विन' स्थिती म्हणता येईल. अनेक पर्यटनस्थळी थीम पार्क, मॉल्स, या विरंगुळ्याच्या व मनोरंजनाच्या सुविधांबरोबरच निवासी सुविधाही का उभ्या राहिल्या आहेत, याचे उत्तर त्यातून मिळते. हा एक प्रकारचा एकत्रीकृत किंवा संमिश्र विकासाचा प्रकार आहे. पर्यटनाचा रिअल इस्टेटवर होणारा परिणाम तपासणे म्हणूनच महत्त्वाचे आहे.

यात पहिला फायदा होतो तो पायाभूत सुविधा वाढण्याचा. पर्यटन स्थळ जितके लोकप्रिय तितक्या या सुविधा सातत्याने वाढतात. इथपर्यंत पोहोचण्यासाठीचे रस्ते, त्या परिसरातील सार्वजनिक वाहतूक सुविधा, हॉटेल्स, रेस्टॉरंट, खाद्यपदार्थ व पेये पुरवणारी आऊटलेट्स, शॉपिंग मॉल्स आणि मनोरंजन केंद्रे हे सर्व हळूहळू तेथे निर्माण होऊ लागते. या परिसरात प्रॉपर्टी असेल तर त्याची किंमतही वाढते. प्रॉपर्टी विक्रीच्या वेळी किंवा भाडेकरू ठेवल्यास याचा फायदा होतो.



लोकप्रिय पर्यटनस्थळी मोठ्या प्रमाणावर लक्झरी सेगमेंटमधील व्हिलाज, अपार्टमेंटही मोठ्या प्रमाणावर होताना दिसतात. परदेशात राहणारे भारतीय नागरीक(एक्सपॅट्स) अशी प्रॉपर्टी घेण्यास उत्सुक असतात. सेकंड होम म्हणून ते त्यात गुंतवणूक करतात व व्हेकेशनमध्ये इथे येऊन राहतात. इतर वेळी हा व्हिला भाड्याने देऊन आर्थिक कमाईही करतात.यासंबंधात डेला या रिअल इस्टेट, रिसॉर्ट व ॲडव्हेंचर पार्क समूहाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक जिमी मिस्त्री यांनी पर्यटन केंद्राची गुणवत्ता वाढीची जी गरज बोलून दाखविली आहे, त्याची दखल पर्यटन खात्याने घेतली पाहिजे.

लोणावळ्यासारख्या ठिकाणचे उदाहरण ते देतात. या परिसराचा पर्यटन स्थळ म्हणून दर्जा उंचावला तर अधिक संख्येने पर्यटक इथे येतील, असे ते म्हणतात. त्यासाठी या क्षेत्राशी संबंधित घटकांनी एकत्र येऊन रोडमॅप तयार करण्याची गरज आहे. येथील ॲडव्हेंचर पार्कमुळे दिल्लीसारख्या शहरांमधूनही मोठ्या संख्येने पर्यटक लोणावळ्याला येऊ लागले आहेत. बॅक पॅकर्स व पर्यटकांना दोन चार दिवसांसाठी भाड्याने रिसॉर्ट वा अपार्टमेंटमध्ये राहणे आता सोयीचे वाटू लागले आहे. इंटरनेटमुळे ऑनलाईन बुकिंगही करता येते व किफायतशीर दरात त्यांना राहता येते. पर्यटन वाढले की देशाच्या जीडीपीतही भर पडते, हेही विसरता येणार नाही.